नवशक्ति
मुंबई, मंगळवार, २९ मार्च २०१६

**SIEMENS**

## टपाल मतदानाची सूचना

सभासदांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, कंपनीने कंपनी कायदा, २०१३च्या (''कायदा'') कलम ११० अंतर्गत व त्यासोबत कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४मधील नियम २० आणि २२, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारणा नियम, २०१५ (''नियम'') द्वारे वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांसंबंधीची सूचना, टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकेचे प्रपत्र आणि स्वत:चा पत्ता लिहिलेल्या बिझिनेस रिप्लाय एन्व्हलप (ज्यांच्यासाठीचा टपालखर्च कंपनीद्वारे भरला जाईल) यांच्यासहित, ज्या सभासदांचे ई–मेल पत्ते उपलब्ध नाहीत त्यांना पाठवावयाचे काम पूर्ण केलेले आहे आणि ज्या सभासदांचे ई–मेल पत्ते नोंदविलेले आहेत आणि ज्यांची नावे, कंपनीच्या हेल्थकेअर अंडरटेकिंगला एक 'गोईंग कन्सर्न' म्हणून सीमेन्स ॲक्टिंजेसेल्सशाफ्ठ, जर्मनीच्या दुय्यम अंगभूत कंपनी असलेल्या सीमेन्स हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडला दिनांक १ जुलै २०१६ पासून विक्री आणि हस्तांतरण करण्यासाठी होकार/नकार देण्यासाठीच्या सामान्य ठरावासाठीच्या सभासदांच्या नोंदवहीत अंतिम तारखेस (कट–ऑफ डेट) म्हणजे, शुक्रवार, दिनांक ४ मार्च २०१६ रोजी असतील, त्यांना ई–मेल पाठविलेले आहेत.

या कायद्याच्या कलम १०८ व नियमातील नियम २० अणि २२ च्या अनुषंगाने व त्यासोबत सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन, २०१५ (''लिस्टिंग रेग्युलेशन्स'') च्या रेग्युलेशन ४४ समवेत वाचून त्या अन्वये कंपनी तिच्या सभासदांना त्यांचे मत, नॅशनल सेक्युरिटिज् डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'') यांनी उपलब्ध करून दिलेल्या रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देण्याची आणि त्याशिवाय जेथे सभासदांना रिमोट ई–व्होटिंगचा उपयोग करून घेणे शक्य नाही, त्यांच्यासाठी टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांच्या माध्यमातून मत देण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे.

टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांच्या माध्यमातून आणि रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून असे दोन्ही प्रकारचे मतदान **मंगळवार, दिनांक २९ मार्च २०१६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भाप्रवे)** सुरू होऊन **बुधवार, दिनांक २७ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता (भाप्रवे)** (दोन्ही दिवस समाविष्ट) संपेल. त्यानंतर रिमोट ई–व्होटिंग मॉड्यूल एनएसडीएलद्वारे निष्क्रिय केले जाईल.

सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की, योग्यपणे पूर्ण केलेल्या आणि सही केलेल्या टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिका छाननीकारांकडे, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये **बुधवार, दिनांक २७ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता (भाप्रवे)** कामकाज संपण्यापूर्वी पोहोचायला हव्यात. सदर तारखेनंतर प्राप्त झालेल्या टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांच्या बाबतीत, सभासदाकडून जणू काही उत्तर मिळालेच नाही असे सक्तपणे समजले जाईल.

टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांद्वारे करावयाच्या मतदानाची प्रक्रिया योग्य आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने छाननीकार म्हणून, मे. पारीख पारेख अँड असोसिएटस्, मुंबई, व्यावसायिक कंपनी सचिव; यांचे श्री. पी. एन. पारीख आणि ते नसल्यास श्रीमती जिज्ञासा वेद यांची नियुक्ती केलेली आहे.

सभासद मतदानाच्या केवळ एकाच पद्धतीचे, म्हणजे रिमोट ई–व्होटिंग किंवा टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिका यांची निवड करू शकतात. सभासदांनी जर सर्व पद्धतींनी त्यांचे मत दिले, तर रिमोट ई–व्होटिंगद्वारे दिलेले मत ग्राह्य धरले जाईल आणि टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकेच्या माध्यमातून दिलेले मत अवैध समजले जाईल.

टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांच्या संबंधीची सूचना डाऊनलोड करण्यासाठी कंपनीच्या www.siemens.co.in/investorcommunity या संकेतस्थळावर आणि एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ज्या सभासदाला टपालाद्वारे पाठवावयाची मतपत्रिका मिळालेली नसेल, तो Corporate-Secretariat.in@siemens.com वर ई–मेल पाठवून त्याची नक्कल प्रत प्राप्त करू शकेल.

इलेक्ट्रॉनिक माध्यमातून किंवा अन्यथा करावयाच्या मतदानाविषयीच्या सूचनांसंबंधी सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीने जारी केलेल्या दिनांक ४ मार्च २०१६ रोजीच्या टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांच्या खाली दिलेल्या टिपा पहाव्यात.

ई–व्होटिंगशी संबंधित काही शंका/तक्रारी असल्यास सभासद www.evoting.nsdl.com च्या ''डाऊनलोडस् सेक्शन''मध्ये उपलब्ध असलेल्या सभासदांनासाठी नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज्) आणि सभासदांसाठीचे ई–व्होटिंग युजर मॅन्युअल पाहू शकतात किंवा ते एनएसडीएलशी पुढील टोल फ्री क्रमांकांवर संपर्क साधू शकतात: १८०० २२२ ९९० किंवा श्रीमती पल्लवी म्हात्रे, सहायक व्यवस्थापिका, नॅशनल सेक्युरिटिज् डिपॉझिटरी लिमिटेड, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई–४०००१३, ई–मेल evoting@nsdl.co.in / pallavid@nsdl.co.in यांच्याशी ०२२ २४९९४५४५ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

टपालाद्वारे प्राप्त मतपत्रिकांचे निकाल कंपनीचे संचालक किंवा कंपनी सचिव कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात **शुक्रवार, दिनांक २९ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ४.०० (भाप्रवे)** वाजता जाहीर करतील. हा निकाल, छाननीकारांच्या अहवालासहित कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.siemens.co.in/investorcommunity वर आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील सूचना फलकावर प्रदर्शित केले जातील. त्याचप्रमाणे छाननीकारांच्या अहवालासहितचे हे निकाल, जेथे कंपनीचे समभाग सूचिकृत केलेले आहेत, त्या स्टॉक एक्सचेंज च्या www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळांवर कळविले जातील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
**सीमेन्स लिमिटेड करिता**
स्वाक्षरी/–
**केतन ठाकर**
**कंपनी सचिव**

ठिकाण: मुंबई
दिनांक: २८ मार्च २०१६

**सीमेन्स लिमिटेड**
**CIN:** L28920MH1957PLC010839
**नोंदणीकृत कार्यालय:** १३०, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई–४०००१८.
**दूरध्वनी:** +९१ २२ ३९६७ ७००० | **फॅक्स:** +९१ २२ ३९६७ ७५००
**संपर्क/ईमेल:** Corporate-Secretariat.in@siemens.com / www.siemens.co.in/contact
**संकेतस्थळ:** www.siemens.co.in